# महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण
## जनसंपर्क विभाग

कक्ष क्रमांक १९/२०, तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई ४०० ०५१.
दू. क्र. : ०२२ ६६४०५०६६, ६६४०६०६७, ६६४०५०७७ संकेतस्थळ : https://mhada.gov.in


=====================================================================

जा.क्र.जसंवि/प्रसिद्धी पत्रक/ १०७५ दि. २९/०४/२०२१

प्रसिद्धी पत्रक

# म्हाडाच्या संक्रमण शिबिरातील भाडेकरू / रहिवाशांकरिता अभय योजनेचा तिसरा टप्पा जाहीर

## दि. ०१ मे २०२१ ते दि. ३१ जुलै २०२१ या कालावधीत संपूर्ण थकीत भाडे भरल्यास व्याजावर ४० टक्क्यांपर्यंत सवलत

मुंबई, दि. २९ एप्रिल, २०२१ :- म्हाडाच्या मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या अखत्यारीतील २१ हजार १४९ संक्रमण शिबिर गाळ्यांमधील भाडेकरू/ रहिवाशी यांच्यासाठी दोन टप्प्यांमध्ये राबविलेल्या अभय योजनेला मिळालेला उत्तम प्रतिसाद बघता या योजनेचा तिसरा टप्पा मंडळातर्फे जाहीर करण्यात आला आहे. योजनेच्या तिसऱ्या टप्प्याअंतर्गत दि. ०१ मे, २०२१ ते दि. ३१ जुलै, २०२१ या कालावधीत संपूर्ण थकीत भाडे भरल्यास भाडेकरू/रहिवाशी यांना थकीत भाड्यावरील निव्वळ व्याजावर ४० टक्क्यांपर्यंत सवलत दिली जाणार आहे.

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या संक्रमण शिबिर गाळ्यांमध्ये राहणाऱ्या भाडेकरू / रहिवाशी यांच्याकडे मोठ्या प्रमाणात भाडे व त्यावरील व्याजापोटी एकूण रु. १२९.९२ कोटी रक्कम थकीत आहे. या योजनेअंतर्गत जे भाडेकरू/ रहिवाशी संपूर्ण थकित रक्कम भरतील त्यांनाच ही सवलत लागू राहील.

मंडळाने नेमून दिलेल्या भाडेवसुलीकारांकडे रितसर भाडे भरून पावती घ्यावी, मंडळाने या कामासाठी कोणत्याही खाजगी व्यक्तीची नेमणूक केलेली नाही, याची सर्व भाडेकरु / रहिवाशी यांनी नोंद घ्यावी, असे आवाहन मंडळातर्फे करण्यात आले आहे.

कोरोना साथरोगाच्या पार्श्वभूमीवर सर्वसामान्यांच्या आर्थिक स्थितीवर झालेल्या विपरीत परिणामांची बाब विचारात घेऊन सदर योजना जाहीर करण्यात आली. सदर योजना फेब्रुवारी-२०२१ व मार्च -२०२१ या दोन महिन्यांमध्ये दोन टप्प्यांत राबविण्यात आली. योजनेच्या पहिल्या टप्प्यात थकीत भाडे रकमेची मुद्दल भरल्यास एकूण व्याजामध्ये ६० टक्क्यांपर्यंत सवलत देण्यात आली तर दुसऱ्या टप्प्यात थकीत भाडे रकमेची मुद्दल भरल्यास एकूण व्याजामध्ये ४० टक्क्यांपर्यंत सवलत देण्यात आली.

मंडळातर्फे संक्रमण शिबिरात पंपमन, इलेक्ट्रिशियन, सुरक्षा रक्षक, उद् वाहन (Lift) देखभाल दुरुस्ती, पाणीपुरवठा, वीज पुरवठा, सफाई कामगार आदी सुविधा पुरविल्या जातात. या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी मंडळातर्फे भाडे आकारणी केली जाते.

**योजनेच्या पहिल्या व दुसऱ्या टप्प्यांत रुपये ५ कोटी ३१ लाख १८ हजार ३३३ थकीत भाडे जमा**

योजनेच्या पहिल्या टप्प्यांतर्गत संक्रमण शिबिर गाळ्यातील भाडेकरू/रहिवाशी यांनी दि. २८ फेब्रुवारी, २०२१ पर्यंत थकीत भाडे रकमेची मुद्दल भरल्यास एकूण व्याजामध्ये ६० टक्क्यांपर्यंत सवलत देण्यात आली. या टप्प्यांतर्गत दि. २८ फेब्रुवारी, २०२१ पर्यंत एकूण ३ कोटी ३३ लाख १०२ रुपये थकीत भाडे भाडेकरू / रहिवाशांनी मंडळाकडे जमा केले.

योजनेच्या दुसऱ्या टप्प्यांतर्गत संक्रमण शिबिर गाळ्यातील भाडेकरू/रहिवाशी यांनी दि. ३१ मार्च, २०२१ पर्यंत संपूर्ण थकीत भाडे रकमेची मुद्दल भरल्यास एकूण व्याजामध्ये ४० टक्क्यांपर्यंत सवलत देण्यात आली. योजनेच्या दुसऱ्या टप्प्यांतर्गत संक्रमण शिबिर गाळ्यातील भाडेकरू/रहिवाशी यांनी दि. ३१ मार्च, २०२१ पर्यंत रुपये १ कोटी ९८ लाख १८ हजार २३१ थकीत भाडे भाडेकरू / रहिवाशांनी भरले.

योजनेच्या पहिल्या व दुसऱ्या टप्प्याचा एकूण १ हजार १९८ भाडेकरू / रहिवाशी यांनी लाभ घेतला व योजनेच्या या दोन टप्प्यांत एकूण रुपये ५ कोटी ३१ लाख १८ हजार ३३३ थकीत भाडे भाडेकरू/रहिवाशांकडून मंडळाकडे जमा झाले.

**अभय योजनेव्यतिरिक्त भाडेकरू/रहिवाशांनी नियमित भरले १ कोटी ५७ लाख ४० हजार थकीत भाडे**

अभय योजनेव्यतिरिक्त भाडेकरू / रहिवाशांनी फेब्रुवारी-२०२१ मध्ये रुपये ८५ लाख ७३ हजार ८७ व मार्च-२०२१ मध्ये रुपये ७१ लाख ६७ हजार ६२२ असे एकूण रुपये १ कोटी ५७ लाख ४० हजार नियमित पद्धतीने थकीत भाडे मंडळाकडे जमा केले.

------- *********-------